www.ecourtsindia.com

MHTH020001232023

**संक्षिप्त दिवाणी दावा क्र. ७/२०२३**
**ॲव्हेन्यू सुपरमार्टस लि. वि. युनिअन ऑफ इंडिया**
**नि.क्र.१४ वर आदेश**

प्रतिवादी यांनी सदर अर्ज हा दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन दाव्यास कैफीयत दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जाचे व त्यावर आलेले वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले.

३. प्रतिवादीचे म्हणणे आहे की, त्यांना दाव्याचे समन्स दि.१७.०२.२०२३ ला मिळाला. ते दि.१८.०२.२०२३ ला हजर झाले. दावा समन्स मिळाल्यापसून त्यांना ९० दिवसांच्या आत म्हणजेच दि.१६.०५.२०२३ च्या अगोदर त्यांची कफियत दाखल करायची होती. उन्हाळी सुट्टीमुळे ते त्यांची कैफियत दि.१६.०५.२०२३ पर्यंत दाखल करु शकले नाहीत. सुट्टी संपल्यानंतर दि.०५.०६.२०२३ रोजी कोर्ट सुरु झाले तेव्हा त्यांना कैफियत दाखल करायची होती. त्यांच्या वकीलांना दि.०५.०६.२०२३ ला प्रतिवादीच्या कार्यालयातून कैफियत मिळाली. त्यांना कैफियत दाखल करण्यास तीन दिवसांचा विलंब झाला आहे. विलंब हा जाणूनबुजून केला नाही. करीता त्यांनी विनंती केली आहे की कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन त्यांना वादीच्या दाव्याला कैफीयत दाखल करण्याची परवानगी दयावी अशी प्रार्थना केली आहे.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHTH020001232023/truecopy/order-1.pdf

४.		वादीचे म्हणणे आहे की प्रतिवादीने विलंबाचे कोणतेही योग्य कारण दिले नाही. सदर अर्ज प्रतिवादीने सही केला नाही तसेच त्यासोबत प्रतिज्ञापत्र जोडलेले नाही. यावरुन असे दिसून येते की प्रतिवादीला याबाबत माहिती नाही.  सदर अर्ज हा वकीलांनी सही करुन दिलेला आहे. करीता प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५.		प्रतिवादीला कैफीयत दाखल करण्याची संधी न दिल्यास त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादीला त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणार नाही. दाव्याचा गुणवत्तेवर निकाल देण्याकरीता प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **<u>आदेश</u>**

१.	निशाणी क्र. १४ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२.	प्रतिवादी यांनी तालुका विधी सेवा समिती, ठाणे येथे रूपये ५००/—(रु पाचशे मात्र) खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

सही/—
(राजश्री म. गणवीर)
४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
ठाणे

ठाणे.
दिनांक: १७/०६/२०२३.

www.ecourtsindia.com
This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHTH020001232023/truecopy/order-1.pdf